**महाराष्ट्र विधानसभा**
**दुसरे अधिवेशन, २०२५**

---------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ / आषाढ २५, १९४७ ( शके )**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री**
**(८) वस्त्रोद्योग मंत्री**
**(९) सहकार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

--------------------------------

**राज्यातील काही जिल्हयांत होत असलेल्या अवैध सावकारीबाबत**

**(१) * ९७०४ श्री.संजय देरकर (वणी), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावकारी व्यवसाय करण्याचा कोणताही शासकीय परवाना नसतांना व्याजाने पैसे देऊन शेतक-यांच्या जमिनी व मालमत्ता बेकायदेशीर हडप केल्याप्रकरणी चंद्रपूर पोलीस ठाण्यात दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी दोन इसमांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर तालुक्यातील गरजू लोकांच्या अडचणींचा गैरफायदा घेऊन अवैध सावकारीचा व्यवसाय करणाऱ्यांविरोधात सहाय्यक निबंधक कार्यालयामार्फत कारवाई करण्याची मोहीम माहे मे, २०२५ मध्ये सुरु केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सुरु असलेल्या चौकशीत संबंधित इसमांकडून ९ शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले असून परवाना नसतांना सावकारी करणे, शेतक-यांच्या जमिनी व मालमत्ता बेकायदेशीर हडप करणे, ठेव म्हणून दिलेले कोरे धनादेश व शिक्याचा गैरवापर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने अवैध सावकारीचा व्यवसाय करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, यापूर्वी सन २०२१-२०२४ या कालावधीत अवैध सावकारी संदर्भात प्राप्त तक्रारींवर चौकशी करण्यात येऊन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ नुसार चंद्रपूर पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सहायक निबंधक, पालघर कार्यालयाकडे अवैध सावकारी व्यवसाय करणाऱ्यांविरोधात माहे मे, २०२५ मध्ये दोन तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यासंदर्भात नियुक्त पथकामार्फत धाडी टाकून झडती घेण्यात आली असता सदर तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले आहे.

(४) या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३९, ४१ (सी), ४५, ४८ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) अन्वये पालघर पोलीस स्टेशन येथे अवैध सावकारी करणा-या एका व्यक्तीविरुध्द F.I.R. क्र.०१४३ दिनांक १६.०५.२०२५ रोजी दाखल केला आहे. तसेच बोईसर पोलीस स्टेशन येथे दोन व्यक्तींविरुध्द F.I.R. क्र.०२१८ दिनांक १७.०५.२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ‘बी.एड’ महाविद्यालयांची मान्यता रद्द झाल्याबाबत

**(२) * १३१९६ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) कडे वेळेत मूल्यांकन अहवाल सादर न केल्यामुळे महाराष्ट्रातील २९५ बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूल्यांकन अहवाल सादर न करणाऱ्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा निर्णय दिनांक २० मार्च, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील अशा महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक असल्यामुळे राज्यातील शिक्षक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वाधिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्णयाचा बी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेवर मोठा परिणाम होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील १६ बी.एड महाविद्यालयांची मान्यता राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली (NCTE) यांनी रद्द केलेली आहे.

(२) प्रस्तुत बाब राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली (NCTE) यांचेशी संबंधित असून याबाबत कोणतेही पत्र अथवा नोटीस प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली (NCTE) यांनी मान्यता रद्द केलेल्या १६ महाविद्यालयापैकी ९ महाविद्यालये बंद असल्याने तेथे विद्यार्थी प्रवेशित झालेले नाहीत. अन्य ७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५०० इतकी आहे. सन २०२४-२०२५ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या ४७१

महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ३६,४३३ इतकी होती. त्यामुळे सन २०२५-२०२६ मध्ये विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयांमध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध राहणार आहे.

राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली (NCTE) यांनी मान्यता रद्द केलेल्या महाविद्यालयांना त्यांच्याकडे अपिल दाखल करण्याची संधी उपलब्ध असून अपिलामध्ये महाविद्यालयांच्या बाजूने निर्णय झाल्यास अशा महाविद्यालयांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**झाशीनगर उपसा सिंचन योजनेंतर्गत कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(३) * १३९१७ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झाशीनगर उपसा सिंचन योजनेकरिता (ता.अर्जुनी-मोरगाव, जि.गोंदिया) सन १९९५ पासून आजपर्यंत १५० कोटी रुपयांहून अधिक खर्च करुनही केलेल्या कामातून शेतकऱ्यांना अद्यापही सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथील स्वस्तिक कंन्स्ट्रक्शन कंपनीस डोंगरगाव वितरिकेच्या दिलेल्या कामात अनियमितता असून नवेगाव येथील वितरिका तयार होण्यापूर्वीच तयार केलेल्या टाक्यांची मोडतोड करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत १५० गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याचे नियोजन असताना गेली ३० वर्षे काम सुरु असून देखिल अद्याप काम पूर्ण झाले नाही, सदर योजनेची कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजना पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही,

झाशीनगर उपसा सिंचन योजनेस मुळ प्रशासकीय मान्यता रु.१४.४३ कोटी किंमतीस दिनांक १८ ऑक्टोबर, १९९६ अन्वये प्रदान करण्यात आली असून द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता रु. १२७.२१ कोटी रक्कमेस दिनांक १८/०३/२०१७ अन्वये देण्यात आली आहे. प्रकल्पाचा बहुतांश भाग वन क्षेत्रात येत असल्यामुळे तात्काळ काम सुरु करता आले नाही. तथापि सन १९९६ पासून प्रकल्पाची कामे सुरु करण्यात आली असून माहे मे, २०२५ अखेर प्रकल्पावर रु.९५.६८ कोटी खर्च झाला असून सन २०२२-२३ पासून सिंचन करण्यात येत आहे. मागील ३ वर्षांत झालेले प्रत्यक्ष सिंचन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सिंचन वर्ष | खरीप हंगाम (हे.) | रब्बी हंगाम (हे.) | उन्हाळी हंगाम (हे.) | एकूण (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२२-२३ | ० | ० | १५० | १५० |
| २ | २०२३-२४ | १५० | ० | ८७ | २३७ |
| ३ | २०२४-२५ | ० | ० | ८० | ८० |

(२) नाही,

झाशीनगर उपसा सिंचन योजने अंतर्गत डोंगरगाव अशी कोणतीही वितरिका कार्यक्षेत्रात येत नाही.

(३) झाशीनगर उपसा सिंचन योजने अंतर्गत १२ गावांना सिंचनासाठी पाणी देण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाला आवश्यक वनजमीन प्रस्तावास सन २००५ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर पंपगृह, उर्ध्व नलिका, वितरणकुंड व मुख्य कालव्याचे काम पूर्ण करण्यात आले. परंतु मुख्य कालव्यावरील भराव काम करण्यासाठी मंजुरीपेक्षा जास्त वनजमीन लागत असल्याने व एका ठिकाणी कठीण खडक लागले असल्याने काही भागात काम प्रलंबित राहीले. सन २०१३-१४ मध्ये सदर वनक्षेत्र नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र घोषित झाले. तसेच सन २०१६ मध्ये ESZ (Eco-Sensitive Zone-पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र) व Buffer Zone घोषित करण्यात आले. वन क्षेत्राच्या प्रकार बदलत गेल्याने वन वळतीकरण प्रस्ताव सादर करण्यास विलंब होत गेला. तसेच वन्यजीव विभाग, वन विभाग व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दि.२९/०८/२०२४ रोजी क्षेत्राची संयुक्त पाहणी केली व त्यामध्ये झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे कुठलेही उर्वरित काम करावयाचे असल्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी आवश्यक असल्याचे वन विभागाने कळविलेले आहे. वन मान्यते अभावी मुख्य कालव्याचे काही भाग व वितरण प्रणालीचे कामे पूर्ण करता आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) झाशीनगर उपसा सिंचन योजने अंतर्गत मुख्य कालवा व वितरण प्रणाली साठी या लघु कालव्याकरीता लागणाऱ्या अतिरिक्त वनक्षेत्रासाठी वनवळतीकरण प्रस्ताव सादर करण्याची सूचना देण्यात आली. त्यानुषंगाने लघु कालव्यांकरीता लागणाऱ्या १५.४०४५ हे. वनक्षेत्राचे वनवळतीकरण प्रस्ताव उपवनसंरक्षक, वनविभाग, गोंदिया यांना दि.२९/०४/२०२५ रोजी सादर करण्यात आले आहे. तसेच ६०.४१५४ हे. क्षेत्राचे राष्ट्रीय वन्यजीव मंडळ मान्यताबाबतचा प्रस्ताव उपसंचालक, नवेगाव-नागझीरा टायगर रिजर्व्ह, साकोली यांना दि.२९/०४/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. त्याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे. वन विषयक आवश्यक मान्यता प्राप्त करून प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (प.), मुंबई येथील भूखंडावर वेगवेगळया सोसायटयांच्या एकत्रित पुनर्विकासामध्ये झालेला गैरव्यवहार

**(४) * ११७३६ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (प.), मुंबई येथील न.भू.क्र.१/१०७, १/१०८, १/१११, १/११२, १/११३, १/११४, १/११५, १/११६ या भूखंडावर वेगवेगळया सोसायटयांचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता कमिटी सदस्य व उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार करुन ७९/अ प्रक्रियेत शासन निर्णय क्र.संकीर्ण ०२२१/प्र.क्र.२४/१३–स, दिनांक १२ मे, २०२२ प्रमाणे सभासदांचा प्रत्यक्ष सहभाग आवश्यक असतांनादेखील व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे २/३ पेक्षा जास्त सभासदांची उपस्थिती दाखवून विकासक मेसर्स किस्टोन रिएलटर्स लि. यांच्या बाजूने निर्णय दिला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक सोसायटयांच्या कमिटीने पत्रक काढून सर्वसाधारण सभा सर्वस्वी असून सभेमध्ये घेतलेला निर्णय अंतिम आहे व त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया रद्द करीत आहोत असे सभासदांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अरेना को.ऑ.हौ.सोसायटी मॅनेजिंग कमिटी व इतर सात सोसायटया, लोखंडवाला, अंधेरी (प.), मुंबई यांचेसोबत या सर्व सोसायटयांच्या कमिटीने पुनर्विकासासाठी केलेल्या कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याकरिता तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री तथा गृह व ऊर्जामंत्री यांना दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागेची मालकी सोसायटीच्या नावे नसतांना नियमबाहय सामुहिक विकास (क्लस्टर) करण्याकरिता विकासक मेसर्स किस्टोन रिएलटर्स लि. यांना संमती देणाऱ्या आठ समित्यांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधित सदस्य, विकासक व उपनिबंधक/सहनिबंधक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) नाही.

अंधेरी (प), मुंबई येथील न.भू.क्र.१/१०७, १/१०८, १/१११, १/११२, १/११३, १/११४, १/११५, १/११६ भुखंडावर वेगवेगळया सोसायटयांचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता संस्थांनी केलेल्या विनंतीनुसार पुनर्विकाससंबंधी सर्वसाधारण सभेसाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई कार्यालयाचा प्रतिनिधी नियुक्त करण्यात आला होता. सदर सर्वसाधारण सभेमध्ये ५१ % पेक्षा जास्त (७० % ते ८८ %) सभासदांच्या बहुमताने मे.किस्टोन रिएलटर्स लि. (रुस्तमजी) यांची पुनर्विकास करण्यासाठी विकासक म्हणून नियुक्ती करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. नमूद संस्थांमधील काही सभासदांना वयोवृध्द/आजारपण/परदेशात असणे किंवा त्यांच्या अडचणीमुळे प्रत्यक्षरित्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यास समस्या असल्यास त्यांना ऑनलाईन प्लॅटफॉर्म/झूमव्दारे उपस्थित राहण्यासाठी संस्थेने सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या होत्या. त्यानुसार काही सभासद उपस्थित होते. त्या सभासदांची विकासक नियुक्तीबाबत लेखी संमती सुध्दा आहे. विकासकांची नियुक्ती सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने झालेली आहे. यामध्ये हस्तक्षेप करण्याचे उपनिबंधक यांना अधिकार नाहीत.
(२) लागू नाही.
(३) असे निवेदन विभागास प्राप्त झाले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकर (जि. नांदेड) येथील रेणापुर सुधा बृ.ल.पा. व पिंपळढव साठवण तलाव या दोन्ही प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(५) * १३२७० ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि. नांदेड) येथील रेणापुर सुधा बृ.ल.पा. व पिंपळढव साठवण तलाव या दोन्ही प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळूनही अद्याप निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे कामांची प्रगती मंदावली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही कामांसाठी उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास विनंती करुनही अद्याप निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास त्या क्षेत्रातील पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने मंजूर निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नसून प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) मा.श्री.अशोक चव्हाण, राज्यसभा सदस्य यांनी दि.०८.०४.२०२५ च्या पत्रान्वये नांदेड जिल्ह्यातील पिंपळढव साठवण तलाव व रेणापुर सुधा बृ.ल.पा या दोन्ही प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली, हे खरे असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) सन २०२५-२०२६ करिता पिंपळढव साठवण तलाव करिता रु.२०.०००० कोटी व रेणापुर सुधा बृ.ल.पा करिता रु.८.५००० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या दोन्ही प्रकल्पासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने निधी मागणी प्रस्ताव सादर केला असून त्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिलिव (ता.माळशिरस, जि. सोलापूर) येथील नीरा उजव्या कालव्याची भिंत कोसळल्याबाबत

**(६) * १३६५० श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिलिव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील ब्रिटिशकालीन नीरा उजव्या कालव्याच्या दक्षिणेकडील भिंतीचे काम सन २००७-२००८ पासून कंत्राटदाराने अपूर्ण ठेवल्याने पाण्याच्या दबावामुळे भिंत कोसळून लाखो लिटर पाणी वाहून गेल्याचे दिनांक ६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भिंतीची तातडीने दुरुस्ती करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह दोषी कंत्राटदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

उन्हाळी हंगामातील आवर्तना दरम्यान पिलिव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील सुमारे १०० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या जलसेतू जवळील नीरा उजवा कालवा किमी १३९/०९० येथील भरावामधील Transition wall मधून पाणी गळती झाल्यामुळे दि.०६/०५/२०२५ रोजी जलसेतूच्या भरावातील Transition wall तुटल्याने भराव वाहून गेला आहे व त्यामुळे कालव्यातील पाणी जलसेतूच्या खाली असलेल्या पिलिव ओढ्यातून वाहून गेले आहे.
(२) नाही.

सदर ठिकाणचे पिलिव ओढ्याची वहन क्षमता ही साधारणपणे २००० क्युसेक्स पेक्षा जास्त असल्याने शेत पिकांचे नुकसान झालेले नाही.
(३) नीरा उजवा कालवा कि.मी.१३९/०९० येथील ब्रिटीश कालीन जलसेतू दुरूस्तीचे काम पूर्ण करून घेण्यात आले आहे.

तसेच शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नसल्याने आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
भरावामधील तुटलेली Transition wall ही १०० वर्षे जुन्या जलसेतूचाच भाग असल्याने या प्रकरणी कंत्राटदारा विरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुही (जि. नागपूर) तालुक्यात विनापरवाना गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(७) * १४१२० श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि. नागपूर) तालुक्यात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून गोसिखुर्द प्रकल्पग्रस्त गावांसाठी लाभक्षेत्राकडे जाणारे पांदण रस्ते व नालीचे काम सुरु असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांच्या कामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाबाबत १०० ब्रास मुरुमची परवानगी असताना जिल्हाधिकारी यांच्या परवानगीविना कंत्राटदार ६०० ते ७०० ब्रॉस अधिकचे गौण खनिज बुडीत क्षेत्रातून उत्खनन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन रॉयल्टीची वसुली करणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
तहसिलदार, कुही यांच्या दि.२९.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये बुडीत क्षेत्राकरिता संपादित करण्यात आलेल्या जागेतून ११००० ब्रास माती / मुरुम उत्खनन करण्याकरिता परवानगी प्राप्त असून मौजा आंभोरा कला व आंभोरा खुर्द पर्यायी गावठाण ते उर्वरित शेतीकरिता रस्ता व त्यावरील बांधकामाचे कामाकरिता आतापर्यंत ५३५१ ब्रास एवढेच उत्खनन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी तालुक्यातील खाजगी शाळांमधील बेकायदेशीर शुल्क वाढीबाबत

**(८) * १२९७८ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी तालुक्यातील महापालिका क्षेत्रातील शेठ जुगीलाल पोतदार इंग्लिश मिडीयम स्कूल व अण्णाभाऊ जाधव शिक्षण संस्थेच्या इतर खाजगी शाळांमध्ये वार्षिक मासिक शुल्क रू.७०० वरून सुमारे रू.७,००० पर्यंत वाढविण्यात आलेले असून, स्थानिक लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण विभाग व जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे सदर संस्थेविरोधात तक्रार करून कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शुल्क वाढ करताना पालक व लोकप्रतिनिधींच्या बैठकीत पारदर्शक निर्णय घेणे आवश्यक असताना, सदर संस्था चालकांनी कोणतीही पूर्वसूचना न देता शुल्क वाढ केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेकायदेशीर शुल्क वाढ करणाऱ्या संस्थाचालक व संस्थेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) खरे आहे.

भिवंडी मनपाच्या कार्यक्षेत्रातील शेठ जुगीलाल पोतदार इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळा धामणकर नाका, या शाळेकडून मागील तीन वर्षांपासून शैक्षणिक शुल्क वाढविण्यात आले नाही. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये इयत्ता १ ते ४ थी साठी रु.७००/- वरुन रु.१२००/- तसेच इयत्ता ५ वी ते १० वी साठी रु.९२०/-वरुन रु.१५००/- एवढी शैक्षणिक शुल्कात वाढ करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. सदर शाळेने शैक्षणिक शुल्क वाढ करते वेळी दि.९.०४.२०२५ रोजी पालक शिक्षक संघाची तसेच दिनांक १२/०४/२०२५ रोजी कार्यकारी समितीची सभा आयोजित केली होती. पालक शिक्षक संघ व कार्यकारी समितीने दिलेल्या मंजुरी प्रमाणे शैक्षणिक शुल्कात वाढ करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(९) * ८९९२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेमार्फत चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशीचा अहवाल अद्यापही शासनास सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी विशेष चौकशी समिती (एसआयटी) नेमून सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन मा. गृह राज्यमंत्री यांनी देवूनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) नाही,

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचेमार्फत चौकशी सुरु करण्यात आली होती. परंतु, सदर चौकशी विरोधात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका क्र. २६६५/२०२५ दाखल केली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६.०५.२०२५ रोजी सदर चौकशीस स्थगिती दिली आहे.
(२) होय.
(३) व (४) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पदभरतीमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता विशेष तपासणी पथक स्थापन करण्यास मा. मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने या प्रकरणी दिनांक २१.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक यांना विशेष तपासणी पथक स्थापन करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील काही महाविद्यालयांनी खाजगी शिकवणी वर्गांशी केलेल्या कराराबाबत

**(१०) * ८७७५ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही महाविद्यालयांनी खाजगी शिकवणी वर्गांशी (प्रायव्हेट क्लासेस) करार करून शिक्षणाचा व्यवसाय मांडला असून, पूर्वी ज्या अभ्यासक्रमाकरिता सुमारे १५,००० ते २०,००० इतका खर्च येत होता, त्या अभ्यासक्रमासाठी आता २ ते २.५ लाखांपर्यंत शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक महाविद्यालयांना शिक्षणाच्या सुविधा स्वतः न पुरवता केवळ शुल्क वसूल करून खाजगी संस्थांमार्फत शिक्षण दिले जात असल्याने अशा प्रकारच्या प्रणालीस काही महाविद्यालयांकडून प्रोत्साहन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेषत: नाशिक जिल्ह्यात असे प्रकार निदर्शनास आले असून शिक्षणाचा व्यवसाय करणारी महाविद्यालये शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा गैरवापर करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची चौकशी करुन शिक्षण व्यवस्थेचे खाजगीकरण व बाजारीकरण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणांच्या चौकशीअंती नाशिक जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील दोषी महाविद्यालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशी तक्रार नाशिक जिल्ह्यासदंर्भात प्राप्त नाही.

(४), (५) व (६) खाजगी शिकवणी वर्गाचे नियमन करण्याकरीता परिपूर्ण अधिनियम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

### राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून शालेय वस्तू खरेदीस करण्यात येणाऱ्या सक्तीबाबत

**(११) * १२२९४ श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक शाळांकडून विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पाठयपुस्तके व इतर शालेय साहित्य ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्यास सक्ती करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सक्तीविरुद्ध कार्यवाही करण्याकरिता सुराज्य अभियानाच्या वतीने दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण मंत्री यांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्देशानंतर विभागाने कोणती कार्यवाही केली, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तसेच शैक्षणिक संस्थांकडून पालकांवर होणारा दबाव व त्यामार्फत होणाऱ्या आर्थिक शोषणास प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) सदर निर्देशाच्या अनुषंगाने तसेच शासन निर्णय दि.११ जून, २००४ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**राज्यातील आठ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे (डीसीसी) असलेल्या जुन्या नोटा बदलून देणेबाबत**

**(१२) * ९१६२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आठ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे (डीसीसी) कोटयवधी रुपयांच्या जुन्या नोटा पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जुन्या नोटा तात्काळ बदलून देण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नकार दिल्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तोटयात आल्या असून त्यात नाशिक, सांगली, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, नागपूर, वर्धा, अमरावतीसह इतर जिल्हा बँकांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जिल्हा सहकारी बँकांच्या कोटयवधी रुपयांच्या जुना नोटा तात्काळ बदलण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
नाशिक, सांगली, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, नागपूर व वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जुन्या/विमुद्रीकृत नोटा आहेत. तथापि, अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे जुन्या/विमुद्रीकृत नोटा नाहीत.
(३) मा. सर्वोच्च न्यायालयाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी दाखल केलेल्या याचिका क्र. ९०६/२०१६ व इतर याचिका यामध्ये निर्णय देऊन संबंधित बँकांनी केंद्र शासनाकडे विनंती अर्ज सादर करण्याबाबत दिनांक २१.०३.२०२३ रोजी आदेश दिले आहेत. सदर विनंती अर्जावर केंद्र शासनाने १२ आठवडयांत निर्णय घ्यावा व केंद्र शासनाच्या निर्णयाने बँकांचे समाधान न झाल्यास बँकांनी संबंधित उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल करण्याबाबत निर्णय दिला आहे. या निर्णयानुसार संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केले असून सदर प्रस्ताव केंद्र शासन स्तरावर प्रलंबित आहे.
जिल्हा बँकांकडे शिल्लक असलेल्या विमुद्रीकृत/निश्चलनीकरण केलेल्या रु.५००/- व रु.१०००/- च्या नोटा रिझर्व्ह बँकेने स्विकारण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**राज्यातील रिक्त असलेली शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेबाबत**

**(१३) * ७८६६ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १५ वर्षांत मराठी माध्यमाच्या २२ हजार शाळा व २.९२ लाख पदे मंजूर असून शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याने सुमारे ७२,००० शिक्षक व शिक्षकेतर पदे कमी झाली आहेत, सन २०२५ मध्ये केवळ ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्यामुळे १३४९ शाळा बंद झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमांकडे कल असणे, ग्रामीण भागातून स्थलांतर व रिक्त पदांमुळे राज्यभर अनेक शाळांमध्ये शिक्षकांच्या अभावामुळे शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच काही शाळांमध्ये एकही शिक्षक नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेकडो उमेदवारांनी मंत्रालयासमोर शिक्षक भरतीबाबत दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रप्रमुख, विषय शिक्षक व इतर रिक्त पदे तात्काळ पदोन्नतीने वा थेट भरतीने भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

काही उमेदवारांनी एकत्र येऊन घोषणाबाजी केल्याचा प्रकार सदर दिनांकास घडला आहे.

(४) केंद्रप्रमुख संवर्गातील मंजूर ४८६० पदे पदोन्नती व मर्यादित विभागीय परीक्षा या मार्गांनी ५०:५० या प्रमाणात भरण्याचा निर्णय सन २०२२ मध्ये घेण्यात आला. पदोन्नतीच्या कोटयातील २४३० पदांपैकी १७३८ पदे भरण्यात आली आहेत. शिक्षकांची ऑनलाईन बदली प्रक्रिया सद्य:स्थितीत चालू असून ती संपल्यानंतर उर्वरित पदे भरण्यास अडचण नाही. मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोटयातील पदे भरण्यासाठी माहे जून, २०२३ मध्ये आयोजित परिक्षेस मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्थगिती देण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयास असलेला आक्षेप दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, या परिक्षेच्या आयोजनाबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल. विषय

शिक्षकांसह सर्व शिक्षक संवर्गाची पदे पवित्र पोर्टलमार्फत भरण्याबाबतची कार्यवाही सातत्याने करण्यात येत आहे. सन २०२२ च्या परिक्षेच्या आधारे पहिल्या टप्प्यात १८,०३४ उमेदवारांची निवड झाली. दुसऱ्या टप्प्यात १०,००० हून अधिक उमेदवार निवडले जाणार आहेत. शिक्षक भरती प्रक्रियेत खंड पडू नये म्हणून शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२५ ही परीक्षा माहे जून मध्ये घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शालेय शिक्षण विभागात होत असलेल्या गैरप्रकारास आळा घालणेबाबत

**(१४) * १३७०६ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या विविध स्तरांवर गैरव्यवहार होत असून मंत्रालयातील अधिकारी/ कर्मचारी वर्गही यात सहभागी असल्याच्या तक्रारी अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनांकडून केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक भरती, समायोजन प्रक्रिया, शालार्थ प्रणालीतील बनावट आयडी वाटप, पेन्शन मंजुरी, शिष्यवृत्ती वाटप, शाळा मान्यता आदी प्रक्रियांमध्ये मोठया प्रमाणावर अनियमितता आढळून आली असून बीड, नाशिक, नागपूर, ठाणे आदी जिल्ह्यांमध्ये शिक्षक भरतीत गैरव्यवहार झाला असून यामध्ये संबंधित शिक्षण उपसंचालक, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग व स्थानिक शिक्षणाधिकारी दोषी आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नाशिक व नागपूर विभागांत रात्रशाळांमध्ये अर्धवेळ व दुबार नियुक्त्या, विनाअनुदानित शिक्षकांना अनुदानित दर्शविण्याचे प्रकार, वेतन तफावत व बनावट नियुक्तीच्या आधारे शासकीय वेतन मिळविणे इत्यादी गैरप्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नांदेड या परीक्षेत्रांतील सन २०१२ ते २०२५ या कालावधीत गैरव्यवहारात जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेसह सदर गैरप्रकारास आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेसह येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय,
याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२), (३) व (४) राज्यातील नागपूर, भंडारा, जळगांव व नाशिक या जिल्ह्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा नियमबाह्यरित्या शालार्थ प्रणालीमध्ये समावेश करून त्यांना वेतन अदा केले जात असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आल्याने सदर प्रकरणाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच शैक्षणिक संस्थांचे कर्मचारी/पदाधिकारी यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार नागपूर येथे गु.र.क्र. २४/२०२५ दिनांक १२/०३/२०२५ व गु.र.क्र.२५४/२०२५ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा तपास विशेष चौकशी पथकामार्फत करण्याची पोलीस विभागास विनंती करण्यात आली असून, त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरू आहे. तसेच नाशिक विभागामध्ये अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावे शालार्थ प्रणाली लॉगीन आयडीचा गैरवापर करून बनावट ड्राफ्ट तयार करून संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन अदा केल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी नाशिक रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०१६४/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत संचालक/सह संचालक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या असून, नागपूर विभागाच्या अनुषंगाने चौकशी अधिकाऱ्यांकडून शिक्षण आयुक्तालयास अंतरिम अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच, चौकशी अधिकाऱ्यांकडून चौकशीची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरणाशी संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

तसेच, राज्यातील अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्यरित्या समाविष्ट केल्यासंदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य स्तरावर विशेष चौकशी पथक (S.I.T.) नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील लघु तलावाची सिंचन क्षमता वाढविण्याबाबत

**(१५) * १४२२८ श्री.सुमित वानखेडे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यातील (जि.वर्धा) येथील सुमारे ४० वर्षांपूर्वीच्या १९ लघु तलावांची दुरवस्था झाली असून त्यातून सिंचन क्षमता अत्यल्प होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी सिंचन क्षमतेमुळे त्या भागातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहत असून त्यांच्या शेतपिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावांच्या वितरण प्रणालीची बऱ्याच वर्षांपासून दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर लघु तलावांची सिंचन क्षमता वाढविणे व वितरण प्रणालीची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत:खरे आहे.

आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यात एकूण १९ लघु तलावाच्या शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात सिंचनास्तव पाणी उपलब्ध करुन दिले जाते. सर्वच तलाव साधारणत: अंदाजे ३५ ते ४० वर्षे जुने झाले असल्यामुळे काही अंशी तलावांची व कालवे वितरण प्रणालीची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे प्रकल्पिय सिंचन क्षमतेच्या तुलनेत काही प्रमाणात सिंचन कमी होत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

दरवर्षी अतिआवश्यक कामे सिंचन / बिगर सिंचन प्रापणसुचीमध्ये समाविष्ट करुन व मंजूर निधीप्रमाणे कामे करण्यात येतात.

(४) सदर ल. पा. प्रकल्पांचे कालव्यावरील मातीकाम, झाडे, झुडपे, साफसफाईचे काम स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे. तसेच बांधकामे दुरुस्तीचे कामे यावर्षीच्या सिंचन / बिगर सिंचन प्रापणसुचीमध्ये प्रस्तावित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापनाबाबत करण्यात आलेली प्रशिक्षणाची तरतूद रद्द करणेबाबत

**(१६)** * **९४४० श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्य शासनाच्यावतीने सन २०१९ मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापनाबाबत अनेक कायदेशीर तरतुदी करताना सहकार विभागाच्या नियमावलीत संस्थेच्या सभासद व्यवस्थापन समितीच्या प्रशिक्षणाची तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना वर्षातून एकदा तीन तासांचे तर व्यवस्थापन समिती तसेच कर्मचाऱ्यांसाठी तीन तासांचे वर्षातून दोन वेळा प्रशिक्षण, सरकारी संस्था जिल्हा हाऊसिंग फेडरेशन किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या खाजगी संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एक लाख वीस हजार गृहनिर्माण संस्थेकडून वर्षाला रुपये १०००/- तर गृहनिर्माण संस्थेमधील सुमारे चार कोटी सभासदांकडून वर्षाला दरमहा रुपये १२०/- इतके प्रशिक्षण शुल्क गोळा करणे बंधनकारक असल्याचे विभागाच्यावतीने आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण-प्रशिक्षणाच्या नावाखाली गृहनिर्माण संस्थेची लूट करून सभासदारांकडून व संस्थेकडून कोटयवधी रुपये वसूल करण्याचा सहकार विभागाचा आदेश रद्द करण्याबाबत नागरिकांनी विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील सहकारी संस्था आणि त्यातील सभासदांच्या माध्यमातून वर्षाला कोटी रुपये गोळा करण्याची शिक्षण प्रशिक्षणाची तरतूद रद्द करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

सन २०१९ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी प्रकरण १३ ब कलम १५४ ब स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे. त्यामधील कलम १५४ ब-६ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यांना सहकार विषयक शिक्षण व प्रशिक्षण देणेबाबतची तरतूद आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रकरणाबाबत अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ दि. १५.०४.२०२५ रोजी प्रारुप नियम शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. सदर प्रारुप नियमातील नियम क्रमांक १०६ सी-७ मध्ये गृहनिर्माण संस्थेचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांच्या साठी प्रशिक्षण व सहकार शिक्षण याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे.

(१) प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था, संस्थेचे संघटन यांचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी राज्य संघीय संस्था किंवा राज्यशिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत वार्षिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करील.

(२) सहकार शिक्षण व प्रशिक्षण निधीसाठी प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्येक सदस्यामागे दरमहा दहा रुपये तर प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संघ किंवा संस्थांच्या संघटना याकरीता वार्षिक रुपये एक हजार इतके अंशदान देईल. अशा अंशदानांचे संकलन करण्यात येईल व त्याचा वापर दरवर्षी आर्थिक वर्षात किंवा पुढील वर्षी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी करण्यात येईल.

(३) शिक्षण प्रशिक्षण कालावधी शक्य होईल तेथवर

(अ) सभासदांसाठी वर्षांतुन तीन तासांचे किमान एक सत्र.

(ब) समितीचे सभासद, पदाधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वर्षातून तीन तासांची किमान दोन सत्रे, इतके असेल.

महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ प्रारुप अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर हज हाऊसच्या इमारतीची दुरुस्ती करणेसह मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१७) * १२२२० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हज हाऊसची अत्यंत दुरवस्था झाली असून त्याठिकाणी शौचालय, पायऱ्या, लिफ्ट, स्वच्छता, पिण्याचे पाणी या सर्व मूलभूत सोयी-सुविधा निकृष्ट अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हज हाऊसच्या विकासासाठी निधीच्या मागणीनुसार शासनाने रुपये १२.५० कोटी इतका निधी मंजूर केला असूनही तो सद्य:स्थितीत अखर्चित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन हज हाऊसच्या दुरुस्तीसह सर्व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नागपूर हज हाऊसच्या इमारतीची डागडुजी व दुरूस्ती तसेच सौंदर्यीकरणाच्या कामास विभागाच्या दि.१४.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १२.०२५१ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता सन २०२४ -२०२५ मध्ये रु.१.२० कोटी निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय दि.३१/३/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला होता. तथापि, सदर रकमेचे देयक काढण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सदरचा निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(३) व (४) नागपूर हज हाऊसच्या इमारतीची डागडुजी व दुरूस्ती तसेच सौंदर्यीकरणाच्या कामाची निविदा प्रक्रीया करण्याकरीता रु.१.२० कोटी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आलेली आहे. वित्त विभागाने निधी उपलब्ध करून दिल्यानंतर सदर कामास निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मद्य कंपनीस पाणी कोटा मंजूर केल्याबाबत

**(१८) * १४३४९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील २१ गावे, १०६ वाड्यांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणी टंचाईमुळे सुमारे ६६ हजार ३०१ लोकसंख्या बाधित झालेली असतानाही जलसंपदा विभागाने खालापूर येथील एका मद्य कंपनीस दररोज १२० दशलक्ष लीटर पाणी कोटा मंजूर केला असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२५ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाताळगंगा नदीतून हे पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मद्य कंपनीस पाणी कोटा मंजूर करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील दिनांक २२ एप्रिल, २०२५ अखेर ६६ हजार ३०१ लोकसंख्या बाधित २१ गावे १०६ वाड्यांना तीव्र पाणी टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा करण्यात येत होता.

पाताळगंगा नदीतून मागणीनुसार खालापूर तालुक्यातील गुळसुंदे, आपटा, खालापूर, माडप, चौक, कुंभिवली, नडोदे या ग्रामपंचायत तसेच खालापुर नगरपरिषद व खोपोली नगरपरिषद यांना पाताळगंगा नदीतून पाणी कोटा मंजुर करण्यात आलेला आहे. तसेच लघुपाटबंधारे योजना व नद्यांमधुन सुमारे ३७ ग्रामपंचायती यांना पाणीकोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

पाताळगंगा नदीच्या उर्वरीत पाणी कोटयातून मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज मौजे खानाव, ता. खालापूर, जि. रायगड या ग्राहकास १.२० दललि/दिन (०.३९४२ दलघमी) इतका पाणी वापर औद्योगिक
कारणांकरीता शासन निर्णय क्र.बिसिंआ २०२५/(६०/२५)सिं.व्य.(धो-२),दि.१७/०४/२०२५ अन्वये दि. ८/०४/२०२५ रोजी मा.मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पाताळगंगा नदीतून मागणीनुसार स्थानिक ग्रामपंचायती यांना पाणी कोटा मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी प्रथम प्राधान्याने असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यास त्यांना पाताळगंगा नदीतून पाणी आरक्षित करण्यात येईल.

उर्वरित पाण्यातून मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज कंपनीस पाणी कोटा मंजुरी देण्यात आलेली असल्यामुळे संबधित अधिकारी - कर्मचारी यांच्यावर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देहरजी (ता.विक्रमगड,जि.पालघर) मध्यम प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१९)** * **१४११३ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) देहरजी मध्यम प्रकल्पात विक्रमगड व जव्हार तालुक्यातील खुडेद, साखरा, भडांगेपाडा, उंबरवागणं, तिवसपाडा, संगमनेर, महालेपाडा इत्यादी अनेक गाव पाडयांतील १७९ कुटुंबे प्रकल्पबाधित झालेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून प्रकल्पग्रस्तांना अद्यापही घरे व शेतीचा मोबदला मिळालेला नाही तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्यासह त्यांना घरे व शेतीचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

देहरजी मध्यम प्रकल्प, ता. विक्रमगड अंतर्गत मौजे खुडेद (तिवसपाडा, महालेपाडा, कुंडाचापाडा) व मौजे साखरे (हनुमाननगर, साखरे गावठाण) ही गावे अंशत: बाधित होत असून सदर गावातील एकूण २६९ कुटुंबे बाधित होत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून प्रकल्पग्रस्तांना घरे व शेतीचा मोबदला देणेबाबत भूसंपादन निवाडा कार्यवाही तसेच पुर्नवसन कार्यवाही महसुल विभागाच्या समन्वयाने प्रगतीत आहे.

(३) प्रकल्पासाठी आवश्यक २३८.०२ हे. खाजगी जमिनीचा प्रारुप निवाडा विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आला होता. त्यावर शासनाने उपस्थित केलेल्या शे-यांच्या अनुषंगाने व शासनाने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने भूसंपादन निवाडा करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसुल), वाडा यांचेमार्फत प्रगतीत आहे.

प्रकल्पबाधितांच्या पुर्नवसनासाठी आवश्यक २९.८८ हे. जमीन मौजे खरीवली, त.कोहज, ता. वाडा या ठिकाणी संपादित करण्यात आली असून सहायक संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पालघर यांचे पत्र दि. ११/०३/२०२५ अन्वये पुनर्वसन जागेचा अभिन्यास उपविभागीय अधिकारी वाडा विभाग, वाडा यांना सादर करण्यात आला आहे व सदर अभिन्यासामध्ये भूखंड आखणीचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच पुनर्वसन आराखडा मान्यतेबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करुन जिल्हाधिकारी, पालघर यांचे मार्फत दि. २०/०६/२०२५ अन्वये पुन्हा विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर मान्यतेनंतर प्रकल्पबाधितांना पुनर्वसन नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सुट्टीच्या दिवशीही पोषण आहार वाटप करून अनुदान घेतल्याबाबत

**(२०) * ८७७० श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील सुमारे ३२९ शाळांमध्ये रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही शालेय पोषण आहार वाटप करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा बंद असतानाही पोषण आहाराचे वाटप दाखवून शासनाकडून अधिकचे अनुदान घेण्याचे प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना लाभ दिल्याबाबतची दैनंदिन नोंद एम.डी.एम पोर्टलवर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लाभार्थी नोंदीनुसार देयके अदा केली जातात. सदर योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यामधील २७५२ पात्र शाळांपैकी १५१ शाळांनी सुट्टीच्या दिवशी पोषण आहाराचा लाभ दिल्याची नोंद एम.डी.एम पोर्टलवर करण्यात आली होती. सदर शाळांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. शाळांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी सुट्टीच्या दिवशी लाभ दिल्याची नोंद केलेल्या शाळांची देयके सादर करताना सुट्टीच्या कालावधीची देयके वजा करुन उर्वरित देयके सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत ज्या शाळांनी सुट्टीच्या दिवशी लाभ दिल्याची नोंद एम.डी.एम पोर्टलवर केली आहे अशा शाळांमधील संबंधितांवर नियमानुसार उचित कारवाई करण्याचे निर्देश सर्व जिल्ह्यांना देण्यात आले आहेत. तसेच, एम.डी.एम. पोर्टलमध्ये सुट्टीच्या दिवशी माहिती भरता येणार नाही, असा बदल करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत एन. आय. सी,पुणे यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श महिला नागरी सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२१) * १३६८० श्रीमती अनुराधा चव्हाण (फुलंब्री) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श महिला नागरी सहकारी बँकेत मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याने हजारो ठेवीदारांचे पैसे अडकले असून अनेक ठेवीदार आर्थिक संकटात सापडले असल्याने काहींनी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेत तीस हजार रुपयांच्यावर ठेवी असलेल्या ठेवीदारांचे एकूण रुपये ३५० कोटी शिल्लक रक्कम देय असून बँकेत रुपये ५ लाखांपेक्षा जास्त ठेवी असलेल्या ठेवीदारांची एकूण रुपये ९१ कोटी रक्कम अद्यापही देय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेचे सन २०१७ ते २०२३ या कालावधीत फेर लेखापरीक्षण झाले आहे काय, त्यामध्ये किती रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले,

(४) असल्यास, पतसंस्थेच्या एकूण १८ मालमत्तांपैकी किती मालमत्ता विक्रीस काढण्यात आल्या आहेत, त्यातून किती निधी प्राप्त झाला आहे, तसेच एम.पी.आय.डी. कायद्याअंतर्गत संस्थेच्या किती मालमत्ता अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत, संबंधित संचालकांच्या मालमत्ता एम.पी.आय.डी. कायद्यांतर्गत आजपर्यंत विक्री झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ परत देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर या बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. २४.०२.२०२३ रोजी आर्थिक निर्बंध लादले असून दि. २९.१२.२०२३ रोजी बँकेचा परवाना रद्द केला आहे. सहकार आयुक्तांच्या दि. ०१.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये बँकेवर अवसायकाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर बँकेच्या ठेवीदारांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

आदर्श महिला नागरी सहकारी बँकेमध्ये एकूण रू. ३१०.०० कोटी ठेवी आहेत. रू.५.०० लाखांवरील ठेवीदारांची रु.९१.०० कोटी रक्कम अद्यापही देणे बाकी आहे.

(३) बँकेचे सन २०१७ ते २०२३ या कालावधीचे फेरलेखापरिक्षण करण्यात आले आहे. सदर अहवालानुसार रू.२०७.३३ कोटीचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या. छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या १८ मालमत्ता विक्रीस काढण्यात आल्या होत्या. त्यापैकी ०६ मालमत्तांच्या विक्रीतून एकूण रू.३.७० कोटी संस्थेकडे प्राप्त झाले आहेत. एम.पी.आय.डी. कायद्यांतर्गत आर्थिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर यांनी मालमत्ता अधिग्रहित केल्या असून शासनामार्फत सक्षम अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, कन्नड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि. छत्रपती संभाजीनगर या बँकेवर आर्थिक निर्बंध लागू केल्यापासून डी.आय.सी.जी.सी. मार्फत रू.५ लाखापर्यंतच्या ९,८१५ ठेवीदारांना रक्कम रु.१९३.२४ कोटी अदा केली आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या. छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या प्रशासक समितीने कर्जाच्या वसूलीसाठी शासनाने मान्यता दिलेली एक रकमी कर्ज परतफेड योजना राबविली आहे. आजअखेर रु.४.८९ कोटी थकीत कर्जाची वसूली झाली आहे. प्रशासक समितीने केवायसी दाखल केलेल्या रु.४०,०००/- पर्यंत ठेवी असलेल्या ४,४५७ ठेवीदारांना रु.५.९७ कोटी इतकी ठेव अदा केली आहे.

----------------

## पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी प्रोत्साहन योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(२२) * ११५८२ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सहकार विभागाकडून शेतकरी प्रोत्साहन योजनेचा निधी वितरित करण्यात येतो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व अन्य काही जिल्ह्यांतील शेतकरी प्रोत्साहन योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी प्रोत्साहन योजनेसाठी सहकार विभागाकडे रूपये ९० कोटी रक्कम वित्त विभागाच्या परवानगी अभावी शिल्लक आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सांगली जिल्ह्यातील विशेषत: वाळवा व शिराळा तालुक्यातील शेतकरी उक्त योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना प्रोत्साहन योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे,

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली सह अन्य जिल्ह्यातील एकूण ९,१८,८८२ कर्जखाती प्राथमिकदृष्ट्या लाभास पात्र ठरली असून यापैकी ९,०३,६०९ कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे. आधार प्रमाणीकरण झालेल्या कर्जखात्यापैकी ८,२४,०२३ कर्जखात्यांना एकूण रु. ३०७८.८८ कोटी प्रोत्साहन लाभ देण्यात आला आहे.

(३) होय.
(४) नाही,

सांगली जिल्ह्यामधील वाळवा तालुक्यातील २१,७८९ कर्जखात्यांपैकी १९,९८६ कर्जखात्यांना एकूण ६८.५४ कोटी व शिराळा तालुक्यातील ७,७९४ कर्जखात्यांपैकी ७,३५२ कर्जखात्यांना २३.६८ कोटी रकमेचा लाभ या योजनेअंतर्गत देण्यात आला आहे.

(५) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत सोलापूर, पुणे, सातारा, सांगली, अहमदनगर व लातूर या जिल्ह्यातील ४४,८९१ कर्जखात्यांना रु. ९२.०३ कोटी रकमेचा लाभ देण्यासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कृषी उत्पन्न बाजार समिती, तुर्भे, नवी मुंबई येथे झालेली बेकायदेशीर नियुक्ती

**(२३)** * **९८९५ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, तुर्भे, नवी मुंबई येथे श्री. शिवनाथ वाघ यांची प्लंबर हेल्पर म्हणून केलेली नेमणूक ही कोणत्याही कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता आवश्यक शैक्षणिक अर्हता, पात्रता तसेच अनुभव व कौशल्यांची पूर्तता न करता बेकायदेशीर पद्धतीने केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री. वाघ यांनी मान्यता नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेचा बेकायदेशीर अध्यक्ष म्हणून स्वतःच्या पत्नीच्या नावे स्थापन केलेल्या कंपनीमार्फत बाजार समितीकडून वाहनसेवा पुरविण्याचे कंत्राट प्राप्त करून वेळोवेळी मुदतवाढ घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नातेवाईकांच्या नावे कांदा-बटाटा बाजार आवारातील मुख्य इमारतीच्या तळमजल्यावर 'जगदंबा हॉटेल' च्या नावाने व्यवसाय सुरू करून, त्या हॉटेलमधील अंतर्गत व बाह्य सजावट "ई-नाम" प्रयोगशाळेच्या खर्चाखाली दाखवून, संबंधित खर्चास शासन मान्यता घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणांबाबत संबंधित कर्मचाऱ्याच्या विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवानियमातील नियम क्र. ४९ मध्ये प्लंबर हेल्पर पदाकरिता किमान ७ वी पास व तत्सम कामाचा एक वर्षाचा अनुभव नमूद केला आहे. त्यानुसार श्री.शिवनाथ वाघ यांनी बाजार समितीकडे केलेल्या अर्जासोबत त्यांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर केले होते. त्यानुसार बाजार समितीच्या प्रशासकीय मंडळाच्या दि.०९.१२.१९९८ रोजीच्या बैठकीत ठराव पारीत केल्याप्रमाणे श्री.वाघ यांची प्लंबर हेल्पर या पदावर नियुक्ती करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने वाहनांसाठी रितसर जाहिरात दि.०५.१०.२०१३ रोजी प्रसिद्ध करुन निविदा मागवून आवश्यक प्रक्रियेअंती ७ निविदा प्राप्त झाल्यापैकी अटी व शर्तीस अधीन राहून ७ संस्थेंसोबत

दि.३१.१०.२०१३ रोजी करार केलेला आहे. सदर संस्थेपैकी मे. हुमजाई टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स ही श्री. वाघ यांच्या पत्नीशी संबंधित आहे. उक्त करार पुढील आदेश होईपर्यंत केलेला आहे. तसेच श्री. वाघ हे सन २०१७ पासून कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष आहे.

(३) हे खरे नाही.

नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने प्रशासकीय इमारत व बाजार आवारातील उपहारगृहे चालविण्यासाठी दि.१५.०२.२०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करुन "ई-निविदा" पद्धतीने मासिक भाडे तत्वावर उच्चतम निविदेनुसार वाटप करण्यात आलेली आहेत.

"ई-नाम" प्रयोगशाळेसाठी परिसराचे सुशोभीकरण बाजार समितीने केलेले आहे. तथापि, "ई-नाम" प्रयोगशाळेसाठी खर्च दाखवून संबंधित हॉटेलमधील बाह्य व अंतर्गत सजावटीचे कोणतेही काम केलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि.जळगाव) येथील गुळ मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळणेबाबत

**(२४) * ११०९८ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगाव) येथील गुळ मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत सन २००८ - २००९ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असून सदर प्रकल्प सन २००९ मध्ये पूर्ण झाल्यानंतरही १६९ शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असले तरीही अद्याप संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त सिंचन प्रकल्पांतर्गत भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला तात्काळ देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे,

गुळ मध्यम प्रकल्पाकरीता ४८२ शेतक-यांची ९०.८७ हे. क्षेत्राचे संपादन आवश्यक असून आतापर्यंत ३१७ शेतक-यांच्या ५३.४९ हे. क्षेत्राचे संपादन करण्यात आले असून उर्वरीत १६५ शेतक-यांचे ३७.३८ हे. क्षेत्राचे संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) गुळ मध्यम प्रकल्पांतर्गत धरण, कालवा व वितरीकांची कामे सन २००९ मध्ये पूर्ण झाली आहेत. सदर कालावधीत कालवा व वितरीकांचे कामांसाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली होती. तथापि सन २०१३ चा नवीन भूसंपादन कायदा अस्तित्वात आल्यामुळे सदर निवाडा व्यपगत झाला. तदनंतर सन २०१६ मध्ये पुन:श्च सरळ खरेदीने खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली. त्यानुसार प्रकल्पांतर्गत कालवा वितरीका कामासाठी ४८२ शेतकऱ्यांची ९०.८७ हे. आवश्यक क्षेत्रापैकी ३१७ शेतकऱ्यांच्या ५३.४९ हे. क्षेत्र दरम्यान संपादीत करून मोबदला अदा केला आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) उर्वरीत १६५ शेतक-यांचे ३७.३८ हे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीद्वारे संपादीत करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत आरटीई २५ टक्के फी प्रतिपूर्ती प्रक्रियेतील गैरव्यवहार

**(२५) * ११३९३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत आरटीई २५ टक्के मोफत शिक्षण योजनेअंतर्गत खाजगी शाळांना देण्यात येणाऱ्या फी प्रतिपूर्तीच्या प्रक्रियेमध्ये मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांकडून प्रतिपूर्ती रकमेसाठी प्रत्यक्षात १० टक्के 'कमिशन' घेतले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रतिपूर्ती प्रकरणांमध्ये निधीचे विहित वितरण वेळेत न करणे, निधी स्वतंत्र खात्यावर वळती करून ठेवणे, ऑनलाईन प्रक्रिया असतानाही प्रतिपूर्तीकरिता नव्याने प्रस्ताव मागविणे, आर्थिक हित जोपासून ठराविक शाळांना निधीचे वितरण करणे, जुजबी त्रुटीच्या कारणास्तव प्रस्ताव अडवून ठेवणे इ. अनेक अनियमितता निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व पात्र शाळांना निधीची समप्रमाणात वितरण करण्याचे शिक्षण संचालक यांचे आदेश असतानाही ठराविक शाळांची निवड करुन १०० टक्के निधीचे वितरण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करून सर्व पात्र शाळांना विहित वेळेत प्रतिपूर्तीची रक्कम वितरीत करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.

तथापि, याबाबत वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

तसेच, पुणे जिल्ह्यातील आरटीई २५ टक्के अंतर्गत शाळांना प्रतिपूर्तीचा रु.१६,८७,७८,०००/- इतका निधी वितरीत करताना कोणतीही शाळा वंचित राहू नये, याकरीता ऑनलाईन गुगल फॉर्मद्वारे संबंधीत शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार ५२८ शाळांकडून प्रस्ताव प्राप्त झाले असून प्रस्तावांच्या छाननीअंती शाळांना त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले. याकरीता संबंधीत शाळांना त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येऊन त्रुटींची पुर्तता करून सादर केलेल्या अर्जांची पुनश्च तपासणी करण्यात आली.

त्याप्रमाणे प्रतिपूर्तीसाठी पात्र ठरलेल्या १५९ शाळांना ५५.५ टक्के या निकषानुसार रु.१६,८५,४०,९०६/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून रु.२,३७,०९४/- इतका निधी शिल्लक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळांबाबत

**(२६) * ७६२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय मान्यता नसतानाही राज्यातील २३२ शाळा, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रात येणा-या सुमारे २१८ प्राथमिक विनाअनुदानित खाजगी शाळा तसेच ठाणे येथे १७५ खाजगी शाळा आरटीई मान्यतेशिवाय सुरु असल्याचे माहिति अधिकारातून दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या ३९ हजार ८१९ विद्यार्थ्यांचे व १ हजार ६६६ शिक्षकांचे भवितव्य अधांतरी असून या संदर्भात केंद्रीय शिक्षण सचिव, श्री.संजय कुमार यांनी मागील वर्षी दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी राज्याच्या शिक्षण विभागाकडे याबाबत विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा अनधिकृत शाळांना ‘शिक्षण हक्क कायदा, २००९’ चे निकष पूर्ण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून मुदत देऊनही निकष पूर्ण केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील झोपडपट्ट्या असलेल्या भागातील बालकांच्या शिक्षणासाठी खाजगी संस्थांनी सुरू केलेल्या शाळांना शिक्षण निरीक्षकाने अनधिकृत शाळा म्हणून घोषित केले असून शाळेसाठी आवश्यक असलेल्या जागेची पूर्तता करणे सदर संस्थांना शक्य नसल्यामुळे शाळांना परवानगी नाकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर शाळांबाबत पालकांची कोणतीही तक्रार नाही तसेच शालेय गुणवत्ता चांगली असल्यामुळे प्रशिक्षित व सक्षम शिक्षक तेथे कार्यरत असल्यामुळे अशा या झोपडपट्टी विभागातील २०० हून अधिक असलेल्या अनधिकृत शाळातील सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने शासनाने जागेबाबतची अट शिथिल करून सदर अनधिकृत शाळांना परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, आरटीई कायद्याचे उल्लंघन करणा-या मुंबई, ठाणेसह राज्यातील विनाअनुदानित खाजगी शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच अशा शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याबद्दल शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

मुंबई विभागातील एकूण ४२० अनधिकृत शाळांपैकी १०३ शाळांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून १२६ शाळांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. तसेच ४७ शाळा बंद करण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रामध्ये खाजगी अनुदानित व विनाअनुदानित एकूण १०५७ शाळा महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या त्या-त्या वेळेच्या मान्यतेने सुरू आहेत. सदर अनुदानित व विनाअनुदानित एकूण १०५७ शाळांपैकी २१८ शाळांनी नमूना-२ ची पुनर्मान्यता/ पुनर्मान्यतेचे नुतनीकरण २०२२ या वर्षात घेतलेली नव्हती. सद्यस्थितीत सदर २१८ शाळांपैकी २११ शाळांना आरटीईची मान्यता देण्यात आली असून ७ शाळा बंद झालेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.
(३), (४), (५), (६) व (७) अंशतः खरे आहे.

शासन स्तरावरून अनधिकृत शाळांवर कारवाई करणेबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, शासन निर्णय, दि.१०.०३.२०१० मधील तरतुदींचे पालन करीत असलेल्या सन २०१३ पूर्वीच्या अनधिकृत शाळा व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील तरतुदींची पूर्तता करीत असलेल्या सन २०१३ नंतरच्या अनधिकृतपणे सुरू असलेल्या शाळा जर उक्त नमूद अधिनियमातील तरतुदींचे पालन करीत असतील तर अशा शाळांच्या प्रस्तावावर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, सदर निकषांची पूर्तता करीत नसलेल्या अनधिकृत शाळा बंद करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या दृष्टीने त्यांचे लगतच्या शाळांमध्ये समायोजन करण्याबाबत देखील सूचना देण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ८५ अनधिकृत शाळांबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुळा उजवा व डावा कालव्यावरील, कालवे व वितरीकांवरील अतिक्रमणाबाबत

**(२७) * १२७३८ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील मुळा धरणाच्या उजवा कालवा ५२ कि.मी. व डावा कालवा २५ कि.मी. येथील कालवे व वितरीका या शासकीय जमिनीवर सुमारे ८५० अतिक्रमणे झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अतिक्रमण ५० वर्षांपासून झालेली असून त्यामुळे आवर्तन व सिंचन यामध्ये मोठया प्रमाणावर अडथळे निर्माण होवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांनी तक्रारी करुनही जलसंपदा विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने सदर कालवे व वितरीकांवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत जलसंपदा मंत्री यांनी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अतिक्रमणे तातडीने हटविणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

मुळा उजवा व डावा मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरीकांवर काही ठिकाणी संपादित जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

मुळा उजवा व डावा मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरीकांवर काही ठिकाणी संपादित जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत. मुळा प्रकल्पावरील मुळा उजवा कालव्यावर एकूण २७९ व मुळा डाव्या कालव्यावर एकूण २८ पाणी वापर संस्था स्थापन झालेल्या असून त्यांचे सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थामार्फत केले जाते. पाणी वापर संस्थांना लघु वितरिकेच्या मुखाशी घनमापन पध्दतीने पाणी मोजून दिले जाते. सिंचन वर्ष २०२४-२०२५ या वर्षात आवर्तने विनातक्रार पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच, पाणी वापर संस्थांची सिंचन व्यवस्थापनाबाबत कोणतीही तक्रार नाही.

(३) मा.मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) महाराष्ट्र राज्य, तथा पालकमंत्री जिल्हा अहिल्यानगर यांनी धरणासह कालवे व वितरिकांवरील अतिक्रमण हटविण्याबाबत जलव्यवस्थापन कृती पंधरवडा, २०२५ अंतर्गत आदेश दिले आहेत.

त्यानुसार अतिक्रमण धारकांना वेळोवेळी नोटीसा देवून स्थानिक प्रशासनाच्या मदतीने ८० पेक्षा जास्त ठिकाणांची अतिक्रमणे काढण्यात आलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

**(२८) * ९७८१ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील धरणांमध्ये पावसाळ्यात पुरेसा पाणीसाठा असून देखील आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत नसल्याने पाणी वापराविना वाया जात आहे, तसेच अनेक गावांना नळ योजनांसाठी कोटयवधी रुपये खर्च करुन देखील घराघरांत पाणी पोहोचविण्यात शासकीय यंत्रणेला अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण आणि पाणी पुरवठा योजनांवर कोटयवधींचा खर्च केल्यानंतरही अनेक गावातील महिलांना उन्हा-तान्हात पाण्यासाठी दारोदार फिरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यात २० पेक्षा अधिक लहान-मोठी धरणे असून कालवे काळजीपूर्वक बांधले गेले नसल्यामुळे गेल्या २० वर्षांपूर्वी जी गावे टंचाईग्रस्त होती, त्या गावांची परिस्थिती आजही तशीच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त तालुक्यातील पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

जलसंपदा विभागाच्या अधिनस्त मारेगाव तालुक्यामध्ये नवरगांव व खंडणी हे दोन पूर्ण झालेले प्रकल्प असून हटवांजरी हा एक बांधकामाधीन प्रकल्प आहे. हटवांजरी प्रकल्पामध्ये माहे जून, २०२२ मध्ये पाणीसाठा निर्मिती करण्यात आलेली असून माहे मार्च, २०२५ अखेरीस प्रकल्पाच्या नलिका वितरण प्रणालीची कामे पूर्ण झालेली आहेत. सिंचन हंगाम २०२५-२०२६ मध्ये या योजनेतून सिंचनास लाभ सुरु होईल. खंडणी प्रकल्पाची निर्मीत ६१९ हेक्टर क्षमतेच्या मर्यादेत या प्रकल्पातून मागणीनुसार सिंचनासाठी पाणी वापरण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नवरगाव प्रकल्पामधून वणी नगर परिषद साठी ३.७४१ दलघमी, मारेगाव नगर पंचायत साठी ०.८७ दलघमी आरक्षण आहे. तसेच भविष्यातील घरगुती वापरासाठी हटवांजरी प्रकल्पामध्ये ०.३५ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असून त्यामधून पाणीपुरवठा योजनेसाठी अद्याप पर्यंत मागणी प्राप्त झालेली नाही. जलसाठा स्त्रोत उपलब्ध करुन देण्याकरिता मारेगांव तालुक्यातील कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीमध्ये प्रलंबित नाही.

सुमारे २०-२५ वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या कालव्यांमध्ये वाढलेली झाडं-झुडपे काढण्याची तसेच नवरगाव प्रकल्पाची वितरण व्यवस्था सुस्थितीमध्ये नसल्याने त्याची सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्यासाठी या प्रकल्पाची दुरुस्ती काम महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) या योजनेच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेली आहेत.

मारेगाव तालुक्यामध्ये १०८ नळ पाणी पुरवठा योजना व ४१ ठिकाणी घरगुती नळ जोडणीची (FHTC) कामे प्रस्तावित असून त्यांची प्राकलित किंमत ३७.०७ कोटी आहे त्यापैकी ३८ योजनांची कामे पूर्ण झालेली असुन २५ घरगुती नळ जोडणीची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर कामांवर एकूण रू.११.३२ कोटी खर्च झालेला आहे. मारेगाव तालुक्यात एकूण १८२१७ कुटुंब असून यापैकी १४५५० कुटुंबांना आतापर्यंत घरगुती नळ जोडणी (७९.८७%) पूर्ण झालेली आहे. त्यामुळे मारेगाव तालुक्यामध्ये पाणी टंचाई नाही. मारेगाव तालुक्यात सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या कालावधीत विहीरी व टँकर अधिग्रहणाची आवश्यकता भासली नाही.

(३) सन २०२४-२०२५ च्या सिंचन हंगामात जलसंपदा विभागाकडील १७८९ हेक्टर क्षेत्रापैकी ७८ टक्के सिंचन झाले आहे. मारेगांव तालुक्यातील प्रकल्पांचे कार्यान्वयन सुस्थितीमध्ये राहील यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यांत शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून पीक कर्ज नाकारल्याबाबत**

**(२९) * ९०२९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांत शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून अतिशय किरकोळ कारणांकरिता पीक कर्ज नाकारल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या असून यावर्षीच्या खरीप हंगामात यवतमाळ जिल्ह्यातील १९ बँकांना रुपये २२०० कोटी इतक्या पीक कर्ज वाटपाचे उदिष्ट देण्यात आले असून माहे एप्रिल, २०२५ अखेर केवळ रुपये ७० कोटी इतक्या रकमेचे पीक कर्ज वाटप झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच देवळी (जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांकडून वेळेवर व पुरेसे पीक कर्ज उपलब्ध होत नसल्यामुळे शेतकरी खाजगी सावकार आणि अवैध सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी व अवैध सावकारांच्या बेकायदेशीर वसुलीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने शासनाने पीक कर्ज नाकारलेल्या संबंधित बँकेवर व संबंधितांवर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

खरीप २०२५ च्या हंगामामध्ये पीक कर्जाच्या मंजूरीबाबत व्यापारी बँकांच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त होत आहेत, ही बाब खरी आहे. तथापि कर्जास पात्र असलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारल्याची बाब निदर्शनास आली नाही.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये सन २०२५ च्या खरीप हंगामासाठी लक्षांक रुपये २२०० कोटी निश्चित करण्यात आला आहे. त्यापैकी दिनांक २३.०६.२०२५ पर्यंत ९२,४९७ शेतकऱ्यांना रुपये ९५५६०.६५ लाख रकमेचे पीक कर्ज वाटप बँकांनी केले असून लक्षांक पूर्तता ४३.४४ टक्के आहे. खरीप पीक कर्ज वाटपाची कार्यवाही सध्या सुरु आहे.

(२) नाही.

देवळी तालुक्यामध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीयकृत/ग्रामीण/व्यापारी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत दिनांक २६.०६.२०२५ पर्यंत एकूण २,०७२ लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये ३४८४.५६ लाख इतके पीक कर्ज वाटप केले आहे. तर परवानाधारक सावकारांकडून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये माहे जून, २०२५ अखेर ५,५९० एवढया कर्जदारांना रूपये ५१२.४१ लाख इतके बिगरशेती (तारण) कर्ज वाटप केले आहे.

(३) सन २०२५-२६ मध्ये खाजगी सावकारांच्या बेकायदेशीर वसुलीमुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघडकीस आली नाही.

(४) व (५) राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकांमार्फत पुरेशा प्रमाणात व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्ज वाटप आढावा समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२०२६ साठी पीकनिहाय कर्जदर दिनांक १०.०३.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कळविण्यात आले आहेत.

सन २०२५-२०२६ मधील पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १९.०५.२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये बँकांना सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे दिनांक २१.०५.२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये सर्व जिल्हाधिकारी यांना मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मार्गदर्शनपर सूचना दिल्या आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील सर्व बँकांना देण्यात आलेल्या पीक कर्ज वाटपाच्या लक्षांकानुसार सर्व पात्र शेतकऱ्यांना पीक कर्जवाटप करण्याबाबत दिनांक २९.०५.२०२५ व दिनांक १६.०६.२०२५ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या सभेमध्ये जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकेचे जिल्हा समन्वयकांना सूचना दिलेल्या आहेत.

तसेच याबाबत वेळोवेळी राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त यांचे स्तरावरुन आढावा घेण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आजनसरा बॅरेज प्रकल्पाला निधी खर्चास अतिरिक्त कालावधी देण्याबाबत

**(३०) * ८२५२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजनसरा बॅरेज प्रकल्पाला सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद रुपये ५५ कोटी इतकी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा नदीवरील आजनसरा बॅरेज प्रकल्पा अंतर्गत काँक्रीट बॅरेजची स्थापत्य व यांत्रिकी कामे अर्थात बांधकाम व मातीकाम सुरू असून सदर काम करते वेळी नदीच्या तिरावरील जमिनीचा अंतिम निवाडा होण्यास व विद्युत वाहिनी हटविण्यास विलंब झाल्यामुळे तिरावरील उत्खनन, नियोजित बांधकाम, कार्यक्रमानुसार होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दगड स्फोटकांच्या सहाय्याने फोडण्याकरिता अद्याप जिल्हाधिकारी, वर्धा यांनी परवानगी दिली नसल्याने बॅरेजचा पाया पातळीपर्यंत पोहचण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पावर आतापर्यंत रुपये ५ कोटी इतका निधी खर्च झाला असून उर्वरित प्राप्त निधी रुपये ५० कोटी एवढा शिल्लक असून आजनसरा बॅरेज प्रकल्पाला प्राप्त निधीमधून रुपये ५० कोटी खर्च करण्याकरिता दिनांक ३० जून, २०२५ पर्यंत अतिरिक्त कालावधी देण्यात यावा, अशी विनंती लोकप्रतिनीधींनी अतिरिक्त मुख्य सचिव जलसंपदा विभाग यांना दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, वर्धा यांचे दि.०३.०४.२०२५ चे पत्रान्वये दगड स्फोटकांच्या सहाय्याने फोडण्याकरिता परवानगी प्राप्त झाली असून त्याअनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) होय, हे खरे आहे
(५) आजनसरा बॅरेज प्रकल्पाला सन २०२४-२०२५ करीता रु.५५ कोटी तरतूद मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी रु.५४.८०४० कोटी निधी बीडीएस प्रणालीवर वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये दि.३१.०३.२०२५ पर्यंत रु.२०.७३८३ कोटी खर्च करण्यात आला होता. आर्थिक २०२४-२०२५ मधील अखर्चित निधी दि. ३१.०५.२०२५ पर्यंत खर्च करण्यास शासनाने परवानगी दिली होती. त्यानुसार याप्रकल्पासाठी अखर्चित निधीपैकी रु.२.२९७३ कोटी इतका निधी दि.३१.०५.२०२५ पर्यंत खर्च करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.